# JUSTICE FOR ALL न्याय सब के लिए




National Campaign to enact the

**PREVENTION OF COMMUNAL AND TARGETED VIOLENCE (ACCESS TO JUSTICE AND REPARATIONS) BILL, 2011**

मागणे आमचे काहीच नाही.
आम्हाला हवा केवळ न्याय.
सर्वांसाठी न्याय.

संविधानाने आम्हाला दिला वसा,
६३ वर्षाचे जुने वचन.

वचन दिले की कोणाही नागरिकाशी,
सरकारे आणि न्यायालये भेदभाव करणार नाहीत,
धर्म अथवा जातीच्या आधारावर नाही,
प्रदेश, भाषा, स्त्री-पुरूष म्हणूनही नाही.

कायदयासमोर सर्व नागरिक समान असतील हे वचन,
सर्व नागरिकांच्या जिवीत-वित्ताचे संरक्षण केले जाईल हे वचन,

मागणे आमचे काहीच नाही,
फक्त दिलेली वचने मोडू नका.

त्या वचनांचे काय होते,
जेव्हा आमची हजारोंनी होत असते कत्तल,
स्त्रीयांवर सामूहिक बलात्कार होतात,
आमची मालमत्ता जाळली, लुटली, नष्ट केली जाते,
पुजास्थाने जमीनदोस्त केली जातात,
पोलिस अन् सरकारे पहात का राहतात ?

कोण आहोत आम्ही ?
आम्ही काश्मिर खोऱ्यातील विस्थापित पंडित,
आम्ही मरडचे हिंदू मच्छीमार कोळी,
आम्ही नेल्ली, भागलपूर, भिवंडी, मुंबई, गुजरातचे मुस्लिम,
आम्ही दिल्ली, कानपूर, काश्मिरचे शीख,
आम्ही मध्यप्रदेश, गुजरात, ओरिसा, कर्नाटकाचे ख्रिस्ती,
आम्ही खैरलांजी, रमाबाईनगर अन् देशभरातले दलित,
आम्ही सगळीकडचे आदिवासी.

कधी
कधी आम्ही महाराष्ट्रातले बिहारी,
कधी कधी कर्नाटकातले तामिळ.

आम्ही समाजा-समाजातल्या स्त्रीया,
आम्ही निर्घृण जळितातल्या बळी,
नेहमीच्याच.

मागणे आमचे काहीच नाही.
आम्हाला हवा केवळ न्याय.
सर्वांसाठी न्याय.

आम्ही मागतो आहे नवा कायदा
६३ वर्षाचे वचन पाळण्यासाठी,
आम्ही मागतो आहे नवा कायदा
मग विद्वेषाच्या विषवल्ली
सरकारे आणि पोलिस पोसणार नाहीत,
नाहीतर त्यांना न्यायालये शिक्षा देतील.

आम्हाला नवा कायदा पाहिजे
मग अपराध्यांना कठोर अन् लवकर शिक्षा होईल,
ते कोणीही आणि कितीही बलवान असले तरी.
कामचुकार पोलिसांनाही शिक्षा होईल,
मगच जगल्या-वाचल्यांना वेळेवर न्याय मिळेल.

आम्हांला नवा कायदा पाहिजे
तेव्हाच सत्तापदी सर्वोच्च स्थानी असलेल्यांना
धरले जाईल जबाबदार केल्या कृत्यांसाठी,
अथवा काही केले नाही म्हणूनही,
कनिष्ठांनी निष्ठापुर्वक काम केले नाही म्हणूनही.

आम्हाला नवा कायदा पाहिजे
झुंडीच्या अत्याचारांतून वाचलेल्यांचे
व्हावे पुनर्वसन भरघोस आणि लवकर यासाठी.

आम्हाला असा पाहिजे नवा कायदा
केवळ नुकसानीची भरपाईच पुरेशी नाही
हे ज्याला कळते आणि जो कायदा
राज्याला हुकूम देतो
की जगल्या-वाचल्यांचे पुनर्वसन
पूर्ण केलेच पाहिजे त्यांच्या प्रतिष्ठा अन् अस्मितेसह.

मागणे आमचे काहीच नाही,
मागतो एवढेच की दिली वचने पाळा.

मागणे आमचे इतकेच की नव्या कायदयाचे
विधेयक ठेवा संसदेसमोर,
६३ वर्षाचे जुने वचन पाळले जावे अन् मोडता येऊ नये कधीही.

आम्ही आता गप्प बसणार नाही.

मागणे आमचे काहीच नाही.
आम्हाला हवा केवळ न्याय.
सर्वांसाठी न्याय.

**जावेद आनंद**

- गेल्या 30 वर्षात दंगली व जळीतांमध्ये जवळ जवळ 10,000 मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, दलित आणि आदिवासी मारले गेले अथवा अपंग झाले आहेत.
- 2002 मधील गुजरातच्या एका नरसंहारात रु 4,500 कोटींची मालमत्ता नष्ट झाली, सुमारे 500 प्रार्थनास्थळे आणि सांस्कृतिक वारसा यांची हानी झाली अथवा त्यांची धुळधाण झाली.
- 1989 मध्ये 3,00,000 पेक्षा जास्त काश्मिरी पंडितांना काश्मिर खोरे सोडावे लागले.
- विधेयकाच्या मसुदयामध्ये अशा प्रकारच्या नरसंहारातील बळींसाठी रु 15 लाख नुकसानभरपाईची तरतुद आहे. नुकसानभरपाई आणि पुनर्वसन महागाई निर्देशांकाशी जोडलेले असावे अशीही तरतूद त्यात आहे.